# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** गोंदिया **P.S.(ठाणे):** डुग्गीपार
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0192 **Year (वर्ष):** 2025
   **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 09/05/2025 03:13

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** गुरूवार
      **Time Period (कालावधी):** पहर 6
      **Date From (दिनांक पासून):** 08/05/2025
      **Date To ( दिनांक पर्यंत):** 08/05/2025
      **Time From (वेळेपासून):** 15:41 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 16:50 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
      **Date (दिनांक ):** 09/05/2025 **Time (वेळ):** 02:41 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
      **Entry No. (नोंद क्र.):** 004
      **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 09/05/2025 02:41 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
      दक्षिण, 5 किमी **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** तलाठी कार्यालय , चिखली,सडक अर्जुनी

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
      **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
      **District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): मोहनलाल शालीकराम चादेवार

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1985

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | चिखली,सडक अर्जुनी,डुग्गीपार,गोंदिया,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | चिखली,सडक अर्जुनी,डुग्गीपार,गोंदिया,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय): शेतकरी

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8208287304

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | कु. अश्विनी शंकर ठोंबरे | | | 1. गुगल काम्प्युटर समोर ,सडर अर्जुनी,सडक अर्जुनी,डुग्गीपार, गोंदिया,महाराष्ट्र,भारत<br>2. रांजोना,वसमत,वसमत ग्रामीण, हिंगोली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | ओमकार ताराचंद शेंडे | | | 1. कोहळी टोला चिखली,सडक अर्जुनी,डुग्गीपार,गोंदिया,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रानिक सामान | रेकॉर्ड प्लेअर | 2 32 GB क्षमतेचे Sandisk कंपनीचे मेमोरी कार्ड | 0.00 |
| 2 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रानिक सामान | मोबाईल फोन | 1 One Plus कंपनीचा जुना वापरता मोबाईल फोन | 4,000.00 |
| 3 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रानिक सामान | मोबाईल फोन | 1 Poco कंपनीचा जुना वापरता मोबाईल फोन | 2,000.00 |
| 4 | कागदपत्रे आणि मुल्यवान रोखे | किरकोळ कागदपत्र | गुन्हे संबंधाने कागदपे | 0.00 |
| 5 | नाणे आणि चलन, | भारतीय- रुपया | लाच रक्कम | 800.00 |
| 6 | इतर | घरगुती वस्तु | 1 पांढऱ्या रंगाचा फुलबाह्याचा शर्ट | 0.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

6,800.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद

पो.स्टे.डुग्गीपार
दि. 08.05.2025

नांवः- मोहनलाल शालीकराम चांदेवार, वय-40 वर्ष, व्यवसाय शेती, रा. चिखली, ता. सडकअर्जुनी, जि. गोंदिया, मो.क्र. 8208287304

मी आज दिनांक 08.05.2025 रोजी समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, उपरोक्त पत्त्यावर आपले कुटंबासह राहत असुन शेतीचे कामे करतो.

माझी आई नामे जमनाबाई शालीकराम चांदेवार हिचे नावे मौजा चिखली ता. सडकअर्जुनी येथे सर्वे क्रमांक 536/1/ब मध्ये 32 आर. एवढी जमीन आहे. माझी आई दिनांक 14.11.2023 रोजी मरण पावली असुन तिचे नावे असलेल्या जमीनीच्या 7/12 वर वारसा हक्काने माझे, माझे वडीलांचे व भाऊ बहिणेचे नावे 7/12 वर चढविण्यासाठी लागणारे सर्व कागदपत्रे घेवुन दिनांक 07/05/2025 रोजी तलाठी साझा क्र. 17 चिखली येथील तलाठी कार्यालयात गेलो असता माझे वडीलांचे व भाऊ बहिणेचे नावे 7/12 वर चढविण्यासाठी तेथील तलाठी ठोंबरे मॅडम यांनी माझेकडे रु.1000/- लाचेची मागणी केली असल्याने त्यांचेविरुध्द कायदेषिर कारवाई होणेस लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया येथे दिनांक 08.05.2025 रोजी तक्रार नोंदविली आहे ती खालीलप्रमाणे आहे.

लेखी तक्रार
दिनांक 08.05.2025

प्रती,
मा. पोलीस उपअधिक्षक साहेब
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया

विषयः- वारसा हक्काने मिळालेल्या शेतीचे 7/12 वर नावे चढविण्यासाठी मला लाच मागणारे तलाठी ठोंबरे मॅडम यांचेवर कायदेषिर कारवाई करणे बाबत.

अर्जदारः- मोहनलाल शालीकराम चांदेवार, वय-40 वर्ष, व्यवसाय शेती, रा. चिखली, ता. सडकअर्जुनी, जि. गोंदिया, मो.क्र. 8208287304

महोदय,

वर नमुद विषायन्वये सविनय सादर आहे की, माझी आई नामे जमनाबाई शालीकराम चांदेवार हिचे नावे मौजा चिखली ता. सडकअर्जुनी येथे सर्वे क्रमांक 536/1/ब मध्ये 32 आर. एवढी जमीन आहे. माझी आई दिनांक 14.11.2023 रोजी मरण पावली असुन तिचे नावे असलेल्या जमीनीच्या 7/12 वर वारसा हक्काने माझे वडील शालीकराम चांदेवार, आम्ही तिन भाऊ मी मोहनलाल शालीकराम चांदेवार, पोहनलाल शालीकराम चांदेवार, सेवकराम शालीकराम चांदेवार व तिन बहीनी नामे शोभा सुर्यभान झिंगरे रा. घाटबोडी ता. सडकअर्जुनी, गीता गिरधर मोटघरे रा. गडपेंढरी ता. लाखनी जि. गोंदिया, गिता घनष्याम मानापुरे रा. कोहलगाव यांचे नावे 7/12 वर चढविण्यासाठी लागणारे सर्व कागदपत्रे घेवुन दिनांक 07/05/2025 रोजी तलाठी साझा क्र. 17 चिखली येथील तलाठी कार्यालयात गेलो असता तिथे तलाठी ठोंबरे मॅडम मिळुन आल्या त्यांना मी सांगीतले की, माझी आई जमनाबाई चांदेवार मरण पावली असुन तिचे नावे असलेल्या जमीनीच्या 7/12 वर माझे वडील, आम्ही तिन्ही भाऊ व तिन बहीनी यांचे नावे चढवायचे आहेत असे सांगीतले. तेव्हा ठोंबरे मॅडम यांनी हे काम करण्यासाठी तुम्हाला रु. 1000/- दयावे लागतील असे सांगीतले. तेव्हा मी त्यांना माझ्या जवळ पैसे नसल्याबाबत सांगीतले असता त्यांनी मला पैसे उदया आणुन देण्यास सांगीतले. तलाठी ठोंबरे मॅडम मागत असलेली रु. 1000/- हि कायदेषिर फिस नुसन लाच रक्कम असल्याची माझी खात्री झाल्याने व तलाठी ठोंबरे मॅडम यांना लाच रक्कम देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्यामुळे त्यांचे विरुध्द कायदेषीर कारवाई करण्याकरीता स्वहस्ताक्षरात तक्रार देत आहे. त्यांचेषी माझे कोणतेही आर्थीक व्यवहार अथवा पुर्व वैमनस्य नाही.

पोलीस निरीक्षक श्री. उमाकांत उगले यांनी माझी तक्रार नोंदवुन घेतल्यानंतर दोन शासकीय पंचांना पाचारण करुन पंच श्री. अमित सुरेष ठवकर वय-39 वर्ष, पद- वरिष्ठ लिपिक, कार्यालयीन पत्ता-कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, क्र. 1 गोंदिया, राहण्याचा पत्ता-प्लॉट नंबर 94 राधानंदनगर मानेवाडा, बेसा रोड, शिवाजी लॉनच्या मागे नागपूर, ता.जि. नागपूर व श्रीमती गुनेष्वरी टिकेष्वर कटरे, वय-39 वर्ष, पद- कनिष्ठ लिपिक, कार्यालयीन पत्ता-कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, क्र. 2 गोंदिया, राहण्याचा पत्ता- द्वारका नगर, साई लॉनजवळ गोविंदपूर, गोंदिया, ता.जि. गोंदिया यांची माझेषी ओळख करुन देवुन त्यांना थोडक्यात हकीकत सांगुन माझी तक्रार वाचावयास दिली. पोलीस निरीक्षक श्री. उगले यांनी श्री. अमित सुरेष ठवकर यांना पंच क्र. 1 तर श्रीमती गुनेष्वरी टिकेष्वर कटरे यांना पंच क्र. 2 म्हणुन नेमले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री उगले यांचे सुचनेवरुन माझे तोंडी तक्रारीवर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली व त्यानंतर पोलीस निरीक्षक उगले यांनी स्वाक्षरी केली.

त्यानंतर पोलीस निरीक्षक उगले यांच्या सांगण्यावरुन मी सापळा कार्यवाहीत वापरण्यात येणारी लाच रक्कम रु. 1000/- ज्यामध्ये 500 रुपये दराची 01, रु. 200/- दराची 01 व रु. 100/- दराच्या 03 चलनी नोटा त्यांच्याकडे जमा केल्या. त्यानंतर त्यांनी लाच रकमेला लावण्यात येणाऱ्या एंथ्रासीन पावडरची वैषिष्टे सांगुन त्या नोटांना एंथ्रासीन पावडर लावण्याचे प्रात्यक्षिक आपल्या अधिनस्त कर्मचारी यांच्या हस्ते पंचासमक्ष करुन दाखवुन त्या नोटांना एंथ्रासीन पावडर लावुन त्या नोटा एका लिफाफ्यात टाकुन लिफाफा पंचासमक्ष सिलबंद करुन ट्रप सुटकेस मध्ये सुरक्षित ठेवुन दिला.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री उगले यांनी दिलेल्या सुचनेवरुन त्यांचे अधिनस्त कर्मचारी यांनी व्हाईस रेकॉर्डर कषा प्रकारे काम करतो याबाबत मला व पंचास सविस्तर माहीती देवुन 32 जिबी क्षमतेचे सॅनडिस्क मायक्रो एसडी असे छापील नाव असलेले व सिरीयल क्र. 4241DVCHA0DN असलेला एक नविन मेमोरी कार्ड पंचासमक्ष काढुन सदर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये टाकले. व्हाईस रेकार्डर मला व दोन्ही पंचाना दाखवुन व्हाईस रेकार्डरचे इंटरनल मेमरी आणि मेमरी कार्डमध्ये कोणत्याच प्रकारची पुर्वीची व्हाईस रेकार्डींग फाईल नसल्याबाबत खात्री करुन दिली. सदर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन त्यामध्ये तक्रारदार व गैरअर्जदार यांचे आवाज कषा पध्दतीने रेकार्ड करण्यात येते, व्हाईस रेकार्डर कषा पध्दतीने बंद करण्यात येतो याबाबत मला व दोन्ही पंचाना समजावुन सांगीतले. त्यानंतर व्हाईस रेकार्डरच्या सहाय्याने मेमरीकार्ड व व्हाईस रेकार्डर फा◌ॅर्मेट करुन पंचानी मेमरीकार्ड व व्हाईस रेकार्डरचे इंटरनल मेमरीकार्ड मध्ये कोणत्याही प्रकारची रेका◌ॅर्ड फाईल नसल्याची खात्री करुन सदर व्हाईस रेकार्डर बंद करुन सुस्थितीत सापळा बॅगमध्ये ठेवण्यात आले.

मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया येथे हजर असतांना माझे मोबाईलवर तलाठी कार्यालय चिखली येथे काम करणारे ओमकार शेंडे यांनी फोन करुन सांगीतले की तलाठी ठोंबरे मॅडम घरी निघुन जातील तुम्ही लवकर पैसे घेवुन या, मॅडमला भेट्टुन आपले काम करुन घ्या असे सांगीतले असल्याने त्यांना मी लवकरच कार्यालयात येत असल्याचे सांगीतले. त्यावरुन गै.अ.तलाठी ठोंबरे मॅडम यांचे विरुध्दची लाच मागणी पडताळणी कार्यवाही आजच तलाठी

कार्यालय चिखली येथे जावुन करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

त्यानंतर मला माझे मोटार सायकल क्रमांक एम.एच.35/एपी-4901 ने ग्राम चिखली जवळील षिवारात जाणेकरीता 14.15 वा. सुमारास रवाना करुन 15.15 वा.पर्यंत पोहचुन तिथे हजर राहण्याच्या सुचना दिल्या त्याप्रमाणे मी चिखली षिवारात पोहुचुन हजर असतांना तिथे पोलीस निरीक्षक श्री उगले हे दोन्ही पंच व आपले पथकासह तिथे हजर आले. त्यांनी लाच मागणी कार्यवाही दरम्यान घेण्यात येणाऱ्या दक्षतेबाबत सुचना समजावुन दिल्या. त्यानंतर गै.अ. ठोंबरे मॅडम यांचेषी लाच मागणी संबंधाने बोलणी करण्याकरीता पंच क्रमांक 1 यांचेसह माझे मोटार सायकलने तलाठी कार्यालय चिखली येथे पाठविण्याचे ठरविले.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री उगले यांचे सुचनेवरुन पंच क्र. 1 यांनी माझी अंगझडती घेवुन त्याबाबतची यादी तयार करुन अंगझडतीत मिळुन आलेल्या वस्तु मला वेळीच परत केल्या. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री उगले यांचे सुचनेवरुन त्यांचे अधिनस्त कर्मचारी यांनी त्यांचे कार्यालयीन डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डर ज्यात सॅनडिस्क कंपनीचा 32 जी.बी. क्षमतेचा, सिरीयल क्र 4241DVCHA0DN चा मेमरी कार्ड टाकुन असलेला वेळ 15.41 वाजता सुरु करुन पंच क्र. 1 व माझे आवाजात लाच मागणी पडताळणी कार्यवाही करीता जात असल्याबाबतचे संभाषण ध्वनिमुद्रित करुन ते व्हाॅईस रेकाॅर्डर कापडी पिषवित ठेवुन दोरीचे सहायाने माझे गळयात शर्टचे आत लटकवुन दिले. त्यानंतर मला पंच क्र. 1 यांचेसह माझे मो.सा ने गै.अ. तलाठी ठोंबरे मॅडम यांचेषी लाच मागणी संबधाने बोलणी करण्याकरीता गै.अ. हजर असलेले तलाठी कार्यालय चिखली येथे जाणेकरीता पाठविले. मी पंच क्र. 1 यांचेसह तलाठी कार्यालय चिखली येथे जावुन गै.अ. ठोंबरे मॅडम यांचेषी बोलणी करून सापळा पथक थांबुन असलेल्या ठिकाणी परत आलो. पोलीस निरीक्षक श्री उगले यांचे सुचनेवरुन त्यांचे अधिनस्त कर्मचारी यांनी माझे गळयात लटकवुन असलेला व्हाईस रेकॉर्डर बाहेर काढुन पंच क्र. 1 यांचे आवाजात वेळ 16.00 वाजता बंद केले.

मी पंच क्र.1 यांचेसह तलाठी कार्यालय चिखली येथे गै.अ. ठोंबरे मॅडम यांचेषी लाच मागणी संबंधाने बोलणी करण्याकरीता गेलो असता गै.अ. ठोंबरे मॅडम हे तलाठी कार्यालयात हजर मिळुन आल्याने त्यांना नमस्कार ठोंबरे मॅडम असे म्हटले असता, त्यांनी नमस्ते असे म्हटले, त्या कार्यालयात खुर्चीवर बसुन काम करीत असलेल्या ओमकार शेंडे यांनी मला पाहुन कोण मरण पावला तुझा असे विचारल्यावर मी त्यांना बहिणीची सासु असे सांगुन तलाठी मॅडम यांना काम झाला का असे विचारले. तेव्हा गै.अ. तलाठी मॅडम यांनी मंडळ अधिकारी मॅडम कडुन नोंदी घेतल्या असे सांगीतल्यावर तक्रारदार यांनी म्हणजे झाला मॅडम असे म्हटल्यावर तलाठी मॅडम यांनी मला तुम्ही फेरफार वालेच आहेत ना असे विचारले तेव्हा मी हो मॅडम असे म्हणुन माझेकडे पैसे कमी आहेत असे सांगीतले असता गै.अ. तलाठी मॅडम यांनी त्यांना किती आहेत. असे विचारले त्यावर मी त्यांना आता म्हणजे घरुन आणुन देतो तुम्हाला असे सांगीतले. त्यावरुन गै.अ. ठोंबरे यांनी मला जाना मगं असे म्हटले त्यावर मी तलाठी मॅडम यांना पाच सहासे कमी करा मी गरीब माणुस आहो, दोन तिनसे रुपये तरी कमी करा असे म्हटल्यावर गै.अ.ठोंबरे मॅडम यांनी मला आठसे रुपये दया असे म्हटले. त्यावर मी त्यांना आठसे रुपये आणुन देतो असे सांगुन त्यांना तुम्ही थांबताना आता असे विचारल्यावर ठोंबरे मॅडम यांनी हो इथेच आहे. असे म्हटले त्यावर मी ठिक आहे असे म्हणुन सापळा पथक थांबुन असलेल्या ठिकाणी परत आलो. ठोंबरे मॅडम यांनी तडजोडीअंती रु.800/- लाच रक्कमेची पंचासमक्ष मागणी करुन ती लाच रक्कम प्राप्त करण्याचा प्रयत्न केल्याची पोलीस निरीक्षक श्री उगले यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकुन खात्री केली. त्यावरुन पोलीस निरीक्षक श्री उगले यांनी गै.अ. यांचेविरुध्दची सापळा कार्यवाही तलाठी कार्यालय चिखली येथे करण्याचे ठरविले.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री उगले यांचे सुचनेवरुन पंच क्र. 1 यांनी माझी अंगझडती घेवुन माझेकडे मिळुन आलेल्या वस्तु मला वेळीच परत केले. पोलीस निरीक्षक श्री उगले यांनी सापळा कार्यवाही दरम्यान घेण्यात येणाऱ्या दक्षतेबाबत मला, दोन्ही पंच व सापळा पथकास सुचना समजावुन सागीतले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री उगले यांचे सुचनेवरुन त्यांचे अधिनस्त कर्मचारी यांनी सुटकेसमध्ये ठेवलेला लाच रक्कमेचा लिफाफा बाहेर काढुन त्या लिफाफ्यातील रु.500/- दराची 01, रु.200/- दराची 01 व रु. 100/- दराची 01 चलनी नोटा असे एकुण रु. 800/- लाच रक्कम वेगळी काढुन पंच क्र. 1 यांचे हस्ते माझे फुलपॅंटचे समोरील उजवे खिषात ठेवुन दिली. उर्वरीत रु. 100/- दराचे 2 चलनी नोट त्या लिफाफ्यात ठेवुन सदरचा लिफाफा आमचे सुचनेवरुन ट्रॅप सुटकेसमध्ये सुरक्षित ठेवुन दिला.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. उगले यांचे सुचनेवरुन त्यांचे अधिनस्त कर्मचारी यांनी 32 जिबी क्षमतेचे सॅनडिस्क मायक्रो एसडी असे छापील नाव असलेले व सिरीयल क्र. 4241DVCHA0HR असलेला एक नविन मेमोरी कार्ड पंचासमक्ष काढुन त्यांचे कार्यालयीन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये टाकले. व्हाईस रेकार्डर मला व दोन्ही पंचाना दाखवुन व्हाईस रेकार्डरचे इंटरनल मेमरी आणि मेमरी कार्डमध्ये कोणत्याच प्रकारची पुर्वीची व्हाईस रेकार्डींग फाईल नसल्याबाबत खात्री करुन दिली.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री उगले यांचे सुचनेवरुन त्यांचे अधिनस्त कर्मचारी यांनी वेळ 16.45 वा. व्हाईस रेकार्ड सुरु करुन त्यामध्ये माझे व पंच क्र. 1 यांचे आवाजात सापळा कार्यवाहीकरीता गै.अ. तलाठी ठोंबरे मॅडम यांचेकडे जात असल्याचे संभाषण ध्वनिमुद्रित करून ते व्हॉईस रेकॉर्डर कापडी पिषवीत ठेवुन दोरीचे सहायाने माझे गळयात शर्टचे आत ठेवुन दिला व मला पंच क्रमांक 1 यांचेसोबत माझे मो. सा. ने गै.अ. तलाठी ठोंबरे मॅडम यांना लाच रक्कम देण्याकरीता तलाठी कार्यालय चिखली येथे जाणेकरीता रवाना केले. त्यानंतर आमचे पाठोपाठ पोलीस निरीक्षक श्री उगले हे पंच क्रमांक 2 व त्यांचे सापळा पथकासह तलाठी कार्यालय चिखली येथे जाण्याकरीता रवाना होवुन ते सर्व तलाठी कार्यालय चिखलीजवळ पोहचुन कोणालाही संषय येणार नाही अषा स्थितीत दबा धरुन बसुन माझे नियोजीत ईषाÚयाची वाट पाहत बसले.

मी पंच क्रमांक 1 यांचेसोबत माझे मोटारसायकलने तलाठी कार्यालय चिखली येथे गेलो असता तिथे गै.अ. तलाठी ठोंबरे मॅडम हजर होते. गै.अ. तलाठी ठोंबरे मॅडम यांना नमस्कार ठोंबरे मॅडम असे बोलुन हे आठशे रुपये घ्या आणि माझा फेरफार चा काम लवकर करुन दया असे म्हटले. असता गै.अ ठोंबरे मॅडम यांनी हाताचा ईशारा करुन लाच रक्कम त्यांचे बाजुला बसुन असलेल्या त्यांचे मदतनिस श्री ओमकार शेंडे यांना देण्यास सांगीतल्याने ती लाच रक्कम श्री ओमकार शेंडे यांना दिली. त्यांनी ती लाच रक्कम दोन्ही हाताने मौजुन आपले शर्टाचे डावे खिषात ठेवले त्यानंतर पंच क्रमांक 1 यांचेसह तलाठी कार्यालयाचे बाहेर येवुन गै.अ यांनी लाच रक्कम स्वीकारल्याचा सापळा पथकास नियोजीत इषारा केला.

मी केलेला नियोजित ईषारा पाहुन पोलीस निरीक्षक श्री उगले हे आपल्या सापळा पथक व पंच क्र. 2 यांचेसह माझे जवळ पोहचले. त्यांनी मला व पंच क्रमांक 1 यांना लाच रक्कम कोणी स्विकारली व कुठे ठेवली याबाबत ईषाराने विचारले असता पंच क्र. 1 यांनी तलाठी कार्यालयातील दरवाज्यातुन दिसत असलेल्या इसमाकडे बोट दाखवुन यांनीच लाच रक्कम स्विकारली असुन त्यांचे बाजुला बसुन असलेल्या महिला हे गै.अ. तलाठी ठोंबरे मॅडम असल्याचे सांगितले व मला त्या ठिकाणाहुन थोडया अंतरावर जावुन थांबण्यास सांगितले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री उगले यांचे सुचनेवरुन त्यांचे अधिनस्त कर्मचारी यांनी माझे जवळील कापडी थैलीत ठेवुन असलेला व्हाईस रेकार्डर बाहेर काढुन पंच क्रमांक 1 यांचे आवाजात 16.50 वाजता बंद करुन कु.अष्विनी शंकर ठोंबरे वय 24 वर्ष, पद-ग्राम महसुल अधिकारी साझा क्र.17,ता.सडकअर्जुनी जि.गोंदिया, सध्या राहणार श्री गजानन राखडे यांचे घरी किरायाने,गुगल क्ला ॅसरुम जवळ, सडकअर्जुनी जि.गोंदिया, मुळ पत्ता-ग्राम रांजोना, ता.वसमत, जि.हिंगोली व श्री ओमकार ताराचंद शेंडे वय 52 वर्ष, व्यवसाय-खाजगी नोकरी, तलाठी साझा क्र.17 चिखली रा.कोहळी टोला, पोष्ट चिखली, ता.सडकअर्जुनी जि.गोंदिया यांना पकडुन त्यांचेकडुन लाच रक्कम हस्तगत केली. याबाबतच्या सविस्तर नोंदी पोलीस निरीक्षक श्री उगले यांनी पंचनामा मध्ये घेतल्या आहेत.

तरी आरोपी कु.अष्विनी शंकर ठोंबरे वय 24 वर्ष, पद-ग्राम महसुल अधिकारी साझा क्र.17, ता. सडक अर्जुनी जि. गोंदिया, सध्या राहणार श्री गजानन राखडे यांचे घरी किरायाने, गुगल क्लॉसरुम जवळ, सडक अर्जुनी, जि. गोंदिया, मुळ पत्ता-ग्राम रांजोना, ता. वसमत, जि. हिंगोली यांनी आपल्या लोकसेवक पदाचा दुरूपयोग करुन माझे आईचे नावाने असलेली मौजा चिखली येथील शेत जमीन माझे, माझे वडीलांचे व भाऊ बहिनीचे नावावर 7/12 मध्ये चढवुन देण्याकरीता रु.1000/- लाच रक्कमेची मागणी करुन तडजोडीअंती रु.800/- लाच रक्कमेची पंचासमक्ष मागणी करुन ती लाच रक्कम श्री ओमकार ताराचंद शेंडे वय 52 वर्ष, व्यवसाय-खाजगी नोकरी, तलाठी साझा क्र. 17 चिखली रा.कोहळी टोला, पोष्ट चिखली, ता.सडकअर्जुनी जि. गोंदिया यांचे मार्फत पंचासमक्ष स्विकारून गैर फायदा घेतला आहे. म्हणुन माझी कु.अष्विनी शंकर ठोंबरे वय 24 वर्ष, पद-ग्राम महसुल अधिकारी साझा क्र.17, ता.सडकअर्जुनी जि.गोंदिया, व श्री ओमकार ताराचंद शेंडे वय 52 वर्ष, व्यवसाय-खाजगी नोकरी, तलाठी साझा क्र. 17 चिखली त्यांच्याविरुध्द कायदेषिर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मराठीत टंकलिखित केली असुन मला पंचासमक्ष वाचुन दाखविले माझ्या सांगण्याप्रमाणे बरोवर व खरी आहे.

(मोहनलाल चांदेवार)
रा. चिखली

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Pramod Domaji Bambode(SI (Sub-Inspector)) / POBN82373 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए'.सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

मोहनलाल चांदेवार ०९।०५।२०२४

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Pramod Domaji Bar
**Rank**(पद): SI (Sub-Inspector)
**No.**(सं.): POBN82373

स्टेशन डायरी अंमलदार
पोलीस स्टेशन डुग्गीपार
जिल्हा गोंदिया

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)